# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील अकरावा रविवार

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना ः सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

**प्रतिसाद:** हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**गीत ः** सामान्य काळातील गीत

**स्तोत्र ११० : १ - ५, ७**

**प्रतिगीत १:** परमेश्वर माझ्या प्रभूला म्हणतो, “माझ्या उजवीकडे बैस”. आल्लेलुया!

माझ्या प्रभूला परमेश्वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बैस.

परमेश्वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

तुझ्या पराक्रमाच्या दिवशी
तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

**प**रमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे
तू युगानुयुग याजक आहेस.

**तु**झ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी
राजांचा बीमोड करील;

**मा**र्गाने चालत असता
तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: परमेश्वर माझ्या प्रभूला म्हणतो, "माझ्या उजवीकडे बैस". आल्लेलुया!

*****

स्तोत्र - १११

प्रतिगीत २: प्रभू करूणामय व वात्सल्यसिंधू आहे. तो आम्हाला त्याच्या अद्‌भुत कृत्यांचे स्मरण करून देतो, आल्लेलुया.

**प**रमेश्वराचे स्तवन करा.
सरळ जनांच्या सभेत व मंडळीत
मी अगदी मनापासून परमेश्वराचे उपकारस्मण करीन.
परमेश्वराची कृत्ये थोर आहेत.
ज्यास ती आवडतात ते सर्व त्यांच्या शोध करितात.

**त्या**ने आपले भय धरणाऱ्यांस अन्न दिले आहे;
तो आपला करार सदा स्मरतो.
त्याने आपल्या लोकांस राष्ट्रे वतनादाखल देऊन
आपल्या कृत्यांचे सामर्थ्य दाखविले आहे.

**त्या**च्या हातची कृत्ये साक्षात सत्य व न्याय आहेत;
त्याचे सर्व विधी विश्वसनीय आहेत.

ते सदासर्वकाळ अढळ असे आहेत.
ते सत्याने व सरळपणाने नेमिलेले आहेत.

**त्या**ने आपल्या लोकांस उद्धारदान पाठवून दिले आहे;
त्याने आपला करार सर्वकाळचा नेमिला आहे.
त्याचे नाव पवित्र व भय योग्य आहे.
परमेश्वराचे भय हा ज्ञानाचा आरंभ होय.
त्याप्रमाणे जे वर्ततात त्या सर्वांस सुबुद्धी प्राप्त होते,
त्याचे स्तवन सर्वकाळ चालते.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत २:** प्रभू करूणामय व वात्सल्यसिंधू आहे. तो आम्हाला त्याच्या अद्‌भुत कृत्यांचे स्मरण करून देतो, आल्लेलुया.

*****

**प्रकटी १९ :१ - २, ५ - ७**

**प्रतिगीत ३:** आमचा प्रभू सर्वसमर्थ परमेश्वर राजा आहे, आल्लेलुया !

‘**आ**ल्लेलुया’, तारण, गौरव व सामर्थ्य
ही आमच्या देवाची आहेत; (प्र. आल्लेलुया)

**का**रण ‘त्याचे न्याय निर्वंध
सत्याचे’ व ‘नीतीचे’ आहेत. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

**आ**ल्लेलुया अहो आमच्या देवाची भीती बाळगणाऱ्या
सर्व लहानथोर दासांनो त्याचे स्तवन करा, (प्र. आल्लेलुया)

‘**आ**ल्लेलुया’, कारण सर्वसमर्थ आमचा ‘प्रभू’ देव
ह्याने राज्य हाती घेतले आहे. (प्र. आल्लेलुया)

**आ**पण आनंद व उल्हास करू
व त्याचे गौरव करू; प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

**आ**ल्लेलुया, कारण कोकराचे लग्न निघाले आहे,
आणि त्याच्या नवरीने स्वत:ला सजविले आहे. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** आमचा प्रभू सर्वसमर्थ परमेश्वर राजा आहे, आल्लेलुया !

**शास्त्रवाचन** १ पेत्र १: ३ - ५

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. जिवंत आशा प्राप्त होण्यासाठी आणि अविनाशी, निर्मळ व अक्षय वतन मिळण्यासाठी, त्याने आपल्या महादयेनुसार येशू ख्रिस्ताच्या मृतातून पुनरूत्थानाच्या द्वारे आपल्याला पुन्हा जन्म दिला; जे तारण शेवटच्या काळी प्रगट होण्यास सिद्ध आहे, ते प्राप्त व्हावे म्हणून जे तुम्ही देवाच्या शक्तीने विश्वासाच्या योगे रक्षिलेले आहा, त्या तुम्हासाठी ते वतन स्वर्गात राखून ठेवले आहे.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: हे परमेश्वरा, आकाशमंडळात तुझे नाव धन्य आहे.
प्रतिसाद: हे परमेश्वरा, आकाशमंडळात तुझे नाव धन्य आहे.
चरण: तू सर्वात व सर्वदा अत्युच्च आणि गौरवी आहेस.
प्रतिसाद: हे परमेश्वरा, आकाशमंडळात तुझे नाव धन्य आहे.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: हे परमेश्वरा, आकाशमंडळात तुझे नाव धन्य आहे.

**मरियेचे स्तोत्र:** लूक १:४६-५५

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** येशूने त्या स्त्रीला म्हटले, "तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे, शांतीने जा."

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा'
त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

**का**रण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्पिढया आहे.'

**त्या**ने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'**त्या**ने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

**आ**पल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

**पि**ता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** येशूने त्या स्त्रीला म्हटले, "तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे, शांतीने जा."

## मध्यस्थीच्या प्रार्थना

**प्रतिसाद:** हे प्रभो, आमच्या आभारस्तवनाचा स्वीकार कर.

**प**रमेश्वर शाश्वत निर्माणकर्ता आहे. तोच आपल्या आशेचा उगमस्थान आहे, त्याच्या प्रेमाने तो सर्व गोष्टींना नवजीवन देतो. म्हणून आत्मविश्वासाने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, आमच्या आभारस्तवनाचा स्वीकार कर.

**हे** प्रभो, सर्व सृष्टीमध्ये जी नियमबद्धता आहे त्याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. मानवी जीवनाच्या दानाबद्दल व नैसर्गिक साधनसंपत्तीबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. प्रतिसाद: हे प्रभो, आमच्या आभारस्तवनाचा स्वीकार कर.

**हे** प्रभो, तुझ्या निर्मितीकार्यात तू मानवाला सहभागी करीत आहेस त्याबद्दल तुझे आभार मानतो. मानवाला दिलेल्या कल्पक दृष्टीबद्दल व नवनिर्मितीच्या कौशल्याबद्दल आम्ही तुझी स्तुती गातो. प्रतिसाद: हे प्रभो, आमच्या आभारस्तवनाचा स्वीकार कर.

**हे** प्रभो, आम्ही संपूर्ण जगातील देशांसाठी प्रार्थना करतो. जे अधिकाराच्या जागी आहेत त्यांनी सर्वांच्या भल्यासाठी व शांतीसाठी कार्य करावे असे कर. प्रतिसाद: हे प्रभो, आमच्या आभारस्तवनाचा स्वीकार कर.

आमच्या स्वर्गीय बापा ...

**समारोपाची प्रार्थना:**

**हे** प्रभू देवा, तुझी आशा धरणाऱ्यांच्या सामर्थ्या, आमच्या प्रार्थनेला पाठिंबा दे. कारण आम्ही दुर्बळ असून तुझ्याविना काहीच करू शकत नाहीत. तुझ्या आज्ञा पाळतांना आमच्या इच्छा व कृती याद्वारे आम्ही तुला संतुष्ट करावे म्हणून तुझ्या कृपेचे साहाय्य आम्हाला सतत दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

प्रतिसाद: आमेन.

समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.